विशेष पोलीस वार्तापत्र

स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा

बुलडाणा

दि.१९/०४/२०२१

श्री. अरविंद चावरीया पोलीस अधीक्षक, बुलडाणा यांनी दिनांक १८/०४/२०२१ रोजी श्री. बळीराम गिते पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बुलडाणा यांना अवैध दारुच्या केसेस तसेच बनावट दारू पकडण्याकरीता आदेशीत केले. त्यावरून श्री. बळीराम गिते पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा. बुलडाणा यांनी एक पथक तयार करून सदर पथकाला बनावट दारु तसेच अवैध दारूच्या केसेस करणे कामी आदेशीत केले.

पोलीस स्टेशन बोराखेडी हददीमध्ये सदरचे पथक गस्तीवर असतांना त्यांना गोपनीय बातमीदाराने खात्रीशीर माहिती दिली की, डिडोळा शिवारातील गणेश पाटणी यांचे मालकीचे एम ॲण्ड जी इंडस्ट्रीज वॉटर प्युरीफाय प्लॅन्ट ज्याचा पत्ता प्लॉट नंबर २१६ वॉटर फिल्टर जवळ डिडोळा शिवार ता.मोताळा जि.बुलडाणा या ठिकाणी सुभाष इंगळे व अमोल चोपडे हे दोघे मिळुन बनावट दारुचा कारखाना चालवुन त्यातुन अवैधरित्या विनापरवाना बनवाट दारुची निर्मीती करुन विक्री करत आहेत. मिळालेल्या खबरे वरून सदर ठिकाणी छापा मारला असता बनावट दारु निर्मीती करण्याचे रसायन व इतर साहीत्य ५,२३,५४८/- रुपयाचा प्रोव्ही माल मिळुन आला. घटनास्थळी आरोपी सुभाषसिंग दिवाणसिंग इंगळे, वय ४७ वर्ष, रा तालखेड ता मोताळा जि बुलडाणा याला अटक करण्यात आली असून आरोपी अमोल रमेश चोपडे, रा जळगांव जामोद जि बुलडाणा हा सदयास्थीतीत फरार आहे. आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन बोराखेडी येथे **अप नं. १८९/२०२१ कलम ६५ (ई), (फ), ७५, ८१, ८३ महा दारूबंदी अधिनियम सह कलम ३२८, ४२०, ४७१, ४७२, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात असून** सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहता श्री. अरविंद चावरीया पोलीस अधीक्षक, बुलडाणा यांनी गुन्हयाचा तपास स.पो.नि. नागेशकुमार चतरकर स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा यांच्याकडे दिला. आज दिनांक १९/०४/२०२१ रोजी आरोपी सुभाषसिंग दिवाणसिंग इंगळे वय ४७ वर्षे रा. तालखेड याला वि.न्यायालयात हजर केले असता. वि. न्यायालयाने त्याची २२/०४/२०२१ पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री. अरविंद चावरिया, पोलीस अधीक्षक, बुलडाणा, श्री. बजरंग बनसोडे, अपर पोलीस अधीक्षक, बुलडाणा, श्री. हेमराजसिंह राजपूत, अपर पोलीस अधीक्षक, खामगांव जि. बुलडाणा श्री. बळीराम गिते, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा यांचे मार्गदर्शनात सपोनि नागेशकुमार चतरकर, पोउपनि श्रीकांत जिंदमवार पोहेकॉ/५२५ सुधाकर काळे, नापोकॉ/८९४ सुनिल खरात, नापोकॉ/२९३ गजानन अहेर, पोकॉ/११८८ विजय वारुळे, पोकॉ/२२५८ विजय सोनोने, पोकॉ/२२३० श्रीकांत चिंचाले तसेच पोस्टे बोराखेडी येथील पोहेकॉ/६२० राजु आगाशे, पोहेकॉ/३४३ नंदकिशोर धांडे,सफौ/१४२३ प्रल्हाद वानखेडे असे स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा व पोलीस ठाणे बोराखेडी यांचे संयुक्त पथकाने केली आहे.

पोलीस निरीक्षक,

स्थानिक गुन्हे, शाखा,

बुलडाणा